नि.फौ.ख.क्र.११७/२०२४
शासन वि. अरूणा व ईतर
**निशाणी क्र.२५**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.४ याची जबानी शपथेवर सुरू :–**

माझे नाव :- नारायण देविदासराव सोळंके,
माझे वय :- ४२ वर्षे,
व्यवसाय :- पो.ह. ब.नं.१२४१, पोलीस स्टेशन, मानवत,
राहणार :- मानवत, ता. मानवत, जि. परभणी.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.४ यांचा सरतपास श्री. पी. एम. लिहीणे, सहा. सरकारी अभियोक्ता यांचे मार्फत :–**

दिनांक ३१/०३/२०२४ रोजी मी पोलीस स्टेशन, मानवत पोलीस हवालदार म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी गु.र.क्र. १५५/२०२४ कलम २९४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ भा.दं.वि. अन्वयेचा तपास माझ्याकडे देण्यात आला होता. तपासकामी मला फिर्याद व प्रथम खबर अहवाल हे कागदपत्रे देण्यात आले होते. माझ्याकडे तपास देण्यात आल्यावर मी तीन साक्षीदारांचे बयान नोंदवले. मी आरोपींना कलम ४१ फौ.प्र.सं. नुसार नोटीस देवून त्यांचे चेहरेपट्टी फॉर्म व ओळखपत्र हस्तगत केले. आता मला सदर नोटीस दाखविण्यात आल्या. त्या त्याच आहेत. त्यावर माझ्या व आरोपींच्या सहया आहेत. त्यांना **नि. २६ व २७** देण्यात येते. त्यानंतर मी घटनास्थळाचा ७/१२ उतारा हस्तगत केला. त्यानंतर आरोपींविरुध्द पुरेसा पुरावा मिळून आल्याने प्रस्तुतचे दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो. ते आज न्यायालयासमक्ष हजर आहेत.

**सरतपास पूर्ण.**

**सर्व आरोपींतर्फे त्यांचे विधीज्ञ श्री. व्ही. जे. काळदाते यांच्यामार्फत साक्षीदाराचा उलटतपास सुरु :–**

२) आता मला अभिलेखावरील दाखल सर्व्हे क्र.६९/१ चा ७/१२ उतारा दाखविण्यात आला. सदर दस्तावरून फिर्यादी ही सदरगटाची मालक व ताबेदार असल्याचे दिसून येत नाही. (सदर दस्त हा आरोपीने तपासी अधिकारी यांना दाखवुन प्रश्न विचारल्यामुळे त्यास **नि.२८** देण्यात येते.)

**निशाणी क्र.२५**

३) मी फिर्याद वाचली होती. सदर नि.२८ वरील ७/१२ उताऱ्यावर घटनेच्या वेळी सदर शेतात कापुस पेरणी करण्यात आल्याबाबतची नोंद नाही. मी सर्व्हे क्र.६९/१ मध्ये कापुस पेरणी केल्याबाबत आजुबाजूच्या शेतकऱ्यांना चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, नि.२८ नुसार आरोपी क्र.१ चे पती निवृत्ती व आरोपी क्र.२ चे वडील उत्तम यांच्या नावे जमीन असल्याचे दिसते. आरोपी व फिर्यादी यांच्यात शेतीचा वाद असल्याबाबतचे दस्त मी हस्तगत केले नव्हते.

४) घटनास्थळ दाट लोकवस्तीचे ठिकाण आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी घटनास्थळाच्या बाजुच्या कोणत्याही त्रयस्थ व्यक्तींचे बयान नोंदवले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रस्तुत प्रकरणात घटनास्थळ पंचनामा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटना घडली नसल्यामुळे मी घटनास्थळ पंचनामा तयार केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, साक्षीदार क्र.१ संजय हे त्यांच्या बयानानुसार ऐकीव साक्षीदार आहेत.

५) साक्षीदार क्र.१ संजय यांनी त्याचे बयान देतेवेळी आरोपी क्र.१ ने त्यांना ''धंदेवाली, तुझे दहा धगडे, तुला भोंगळे करून मारू'' अशी शिवीगाळ केली तसेच त्यांचे घर घटनास्थळाच्या शेजारी असल्याने त्यांना आरडाओरड ऐकू आल्याने ते तिथे गेले होते, या बाबी सांगितल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्यावरून मी एकतर्फी तपास केला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींविरूध्द सबळ पुरावा मिळून आल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीचा तपास केला व खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

श्रृ. नि. स्वि.,

स्वाक्षरीत/–

**(श्रीमती पी. सी. फटाले)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मानवत.

ठिकाण : मानवत
दिनांक: १७/०४/२०२६